\\Amol\amol (d)\Pendrive Data\YUNUS\Bandhkam\T-A-Bhusawal.doc

वाचले :-१) श्री. संजय नामदेव भिरुड रा. भुसावळ ता. भुसावळ जि. जळगाव यांचा दि. २२/८/२०१३ चा अर्ज.
२) तहसिलदार,भुसावळ यांचे अहवाल क्र. जमीन-१/बांधकाम/एसआर/९२/२०१३ दि. ३०/५/२०१४.
३) म. सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगाव यांचेकडील पत्र जा. क्र. बांप/मौजे भुसावळ गट नं. ७१/१अ/भू.क्र. ३१/वाणिज्य+रहिवास प्रयोजन/ससं-जळ/१९११ दि. ११/६/२०१४.
४) मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडील आदेश क्र. महसूल/बि.शे./एसआर/८९२ दि. १९/६/१९८५.
५) मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडील आदेश क्र. जमीन/१०८९/१५९२ दि. ८/११/१९८९

------------------------------------------------oooooooo------------------------------------------------

क्र. जमीन/बांधकाम/कावि/९८०/१३
उप विभागीय अधिकारी,
भुसावळ भाग यांचे कार्यालय,
भुसावळ दि.२४ /०७/२०१४

## आदेश

श्री. संजय नामदेव भिरुड रा. भुसावळ ता. भुसावळ जि. जळगाव यांनी त्यांचे मालकीचा मौजे भुसावळ ता. भुसावळ येथील स.नं. ७१/१अ मधील प्लॉट नं. ३१ क्षेत्र ४८१.८४ चौ.मी. या जमिनीचे रहिवास+दुकान (Shops) वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम नकाशांना मंजूरी मिळणेकामी विनंती केलेली आहे.

मौजे भुसावळ ता. भुसावळ येथील स.नं. ७१/१अ या गटास मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी त्यांचेकडील आदेश क्र. महसूल/बि.शे./एसआर/८९२ दि. १९/६/१९८५ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी देण्यात आलेली आहे. सदरची जमीन ही भुसावळ नगर परिषदेच्या हद्दीबाहेर आहे. तसेच सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगाव यांनी त्यांचे उपोद्घातात नमूद दि. ११/६/२०१४ च्या पत्रान्वये सदर भूखंडाचे बांधकाम नकाशांना परवानगी देणेकामी शिफारस केलेली आहे.

नगरपालिका हद्दीबाहेरील अकृषिक भूखंडांचे बांधकाम नकाशांना मंजूरी देण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. त्यामुळे मी उपविभागीय अधिकारी, भुसावळ भाग, भुसावळ मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, श्री. संजय नामदेव भिरुड रा. भुसावळ ता. भुसावळ जि. जळगाव यांना त्यांचे मालकीचा मौजे भुसावळ ता. भुसावळ येथील स.नं. ७१/१अ मधील प्लॉट नं. ३१ क्षेत्र ४८१.८४ चौ.मी. या जमिनीचे रहिवास+दुकान (Shops) वाणिज्य प्रयोजनार्थ बांधकाम नकाशांना खालील अटी व शर्तीवर मंजूरी देत आहे.

अटी :-

१) बांधकामाच्या ठिकाणी डिसप्ले बोर्ड लावणे व त्यावर खालील प्रमाणे तपशील नमूद करणे आवश्यक राहील.
अ) जागा मालकांचे, डेव्हलपरचे, वास्तुतज्ञाचे आणि कॉन्ट्रॅक्टरचे नाव व पत्ते, स.नं./सि.स.नं./ग.नं./वार्ड नंबर इत्यादी भूखंडाचा तपशील.
ब) बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक.
क) अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र.
ड) निवासी गाळयांची संख्या व क्षेत्र.
ई) मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणाचे/कार्यालयाचे नाव व पत्ता.
२) भूकंप विरोधक व्यवस्था अर्जदार यांनी करणे बंधनकारक राहील.
३) रेनवॉटर हार्वेस्टींग सिस्टीमची **(Rain Water harvesting system)** व्यवस्था करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
४) इमारतीचे बांधकाम करताना साहित्यांत प्लाय ॲश विटा प्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करावा.
५) इमारतीमध्यें पिण्याच्या पाण्याचे नळ, वॉश बेसिन, क्लीनर सीक, नळाच्या तोटया व युरीनल्स ची पुरेशी व्यवस्था अर्जदार यांनी करावी.
६) अभिन्यासातील क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणेची व्यवस्था अर्जदार यांनी करावी. तसेच सांड पाण्याचे निचऱ्याची व्यवस्था करावी.
७) जागेवर विद्युत वाहिनी असल्यास त्या अर्जदार यांनी स्वखर्चाने रत्याचे कडे वळवून घ्याव्यात.
७) इमारती करीता वातायनाची व्यवस्था चटई क्षेत्राच्या १/१० पेक्षा कमी नसावी.
८) सदरहू जागेतील सध्या अस्तित्वात असलेली झाडे विना परवानगीने तोडू नये.
९) सदरहू प्रकरणात बांधकाम नकाशंना मंजूरीची शिफारस करताना अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेले मालकी हक्काचे कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभूल करणारे आढळून आल्यास सदर बांधकाम नकाशांना मंजुरीची शिफारस रद्द समजण्यात येईल. तसेच, सहाय्यक संचालक, नगर रचना जळगाव यांचेकडील दि. ११/६/२०१४ चे पत्रातील इतर सर्व अटींचे पालन करणे बंधनकारक असून, रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम नकाशे मंजुरीची शिफारस, ही सदर शिफारस केल्यापासून एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील. तद्नंतर त्यास नियमानुसार मुदतवाढ घेणे बंधनकारक राहील.
१०) प्रत्येक भूखंडधारकास किमान दोन वृक्ष लावणे बंधनकारक राहील.

उपविभागीय अधिकारी भुसावळ भाग भुसावळ सत्यमेव जयते

स्वाक्षरीत/-
(विजय भांगरे)
उपविभागीय अधिकारी,
भुसावळ भाग, भुसावळ

प्रत :- श्री. संजय नामदेव भिरुड रा. भुसावळ ता. भुसावळ जि. जळगाव.
प्रत :- तलाठी भुसावळ ता. भुसावळ जि. जळगाव यांना आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.

उपविभागीय अधिकारी
भुसावळ भाग, भुसावळ
२४/७/१४